Clarification

a , b , f and h – सिबिओ कडून प्राप्त demand letter व इतर अनुषंगिक कागदपत्रे हे DIU कडून प्राप्त होते. त्यामुळे सदर demand letter ची मुळ प्रत काही वेळेस DIU कार्यालयास ठेवण्यात येते किंवा कधी कधी DIU मार्फत सिबिओ demand letter व इतर कागदपत्रे शासकीय ई-मेल व्दारे या कार्यालयास प्राप्त होतात त्यामुळे ते ग्राह्य धरण्यात येतात. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार फक्त मुळ Grant Agreement असणे बंधनकारक आहे.

c. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार सद्य स्थितीत grant agreement stamp पेपर वर करणेबाबत बंधनकारक करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे सिबिओ मार्फत सादर करण्यात आलेले मुळ agreement या कार्यालय मार्फत स्वीकारण्यात आलेले आहे.

d. काही वेळेस शासकीय प्रतीनिधी म्हणजेच प्रकल्प संचालक आत्मा व बँक manager यांचे फोटो सिबिओस उपलब्ध होत नाहीत.

e. मूळ Grant Agreement अनुदान नस्तीस लावण्यात आले आहे.

j. सिबिओस उप प्रकल्प मंजुरी आदेश दिल्यानंतर सदर सिबिओ आपले उपप्रकल्पास कर्ज मिळणेसाठी प्रस्ताव बँकेत सादर करतात. बँकेकडून आवश्यक कागद पत्रांची पूर्तता झालेनंतर बँक अधिकाऱ्या मार्फत क्षेत्रीय भेट देऊन सदर प्रकरण प्रादेशिक/ झोनल कार्यालयास मंजुरीसाठी पाठवले जाते. झोनल कार्यालयामार्फत देखील सदर प्रकरणाची छाननी व आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर मंजुरी देण्यात येते व त्यानंतर सिबिओ स्वहिस्सा उभारणी करून अनुदान मागणीचा प्रस्ताव जिल्हा अंमलबजावणी कक्षास सादर करतात. जिल्हा अंमलबजावणी कक्षा मार्फत विभागिय अंमलबजावणी कार्यालयास व त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी कार्यालयास प्रस्ताव सादर होतो. प्रकल्प अंमलबजावणी कक्षस्तरावर आवश्यक कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर अनुदान वितरणाची कार्यवाही केली जाते. यासंपूर्ण प्रक्रियेस बराचसा कालावधी लागतो.स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावली नुसार उपप्रकल्प मंजुरी नंतर अनुदान वितरीत करणे साठी कोणत्या हि स्वरुपाचे कालमर्यादेची बंधन देण्यात आलेले नाही.

i. प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष (PCMU) मार्फत Grant Agreement चे जे विहित नमुने देण्यात आले होते त्याच नमुन्यांमध्ये Grant Agreement करणे बंधनकारक असल्याने त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

j. स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय नियमावलीनुसार प्रथम हप्ता वितरीत करताना आवश्यक कागदपत्रांच्या चेक लिस्ट मध्ये सदर बाब समाविष्ट नसल्याने अशा प्रकारचे Resolution घेण्यात आलेले नाही.